# डेलावेअर व्हॅली मराठी मित्र मंडळ

DVMMM: Delaware Valley Marathi Mitra Mandal

## हितगुज

वर्ष २, अंक १ मार्च २१, २००३



**DVMMM Executive Committee**

**President**
Vanita Kubal
(302) 453-8738

**Vice President**
Prashant Karandikar
(610) 268-0807

**Treasurer**
Vinay Pradhan
(302) 239-0542

**Secretary**
Ashish Chaughule
(302) 235-7295

**Cultural Secretary**
Pradip Khaladkar
(302) 239-6204

**WebPage/YahooGroups**
Sandeep Karode
(302) 478-6789

**Karyakarte**
Anjou Sathe-Keller
(302) 376-1994
Samarth Joshi
(302) 892-2887
Shaila Vaidya
(610) 274-8627

http://dvmmm.i8.com

http://groups.yahoo.com/groups/marathimandal


हितगुजच्या सर्व वाचकांना भारतीय नववर्षाच्या शुभेच्छा

## होळी आणि गुढी पाडवा

शिशिर ऋतू संपून वसंताची चाहुल लागत आहे. कडक शिशिरामुळे मंडळी एकदम ग्रीष्मातच जायला उत्सुक झाली आहेत. त्यामुळे विंटर कोट बासनात जाऊन अर्ध चड्ड्याच बाहेर येऊ लागल्या आहेत. हा ऋतू बदल साजरा करणारा होळीचा सण. थोरामोठयांची बिनदिक्कत आगळिक करायची परवानगी हया एकाच दिवशी आबालवृदधांना असते. तेव्हा "होळी रे होळी, पुरणाची पोळी, क्षक्षक्षक्ष क्षक्षक्ष, क्षक्षक्षक्ष क्षक्ष" हे वाचकांनी आपापल्या सवयीनुसार म्हणून घ्यावे . पाडव्याला नववर्षाची गुढी उभारायची असते. पाश्चिमात्य नववर्षी संकल्प करायची संधी हुकली असेल तर तो करायची दुसरी संधी गुढी पाडव्याला. तेव्हा होळी आणि पाडवा हे दोन्ही सण (तपशील पान २ वर) साजरे करायला ५ एप्रिलला नक्की यायचं हं ! शैला वैद्य मंडळाच्या समितीवर नव्या कार्यकर्त्या म्हणून नेमल्या गेल्या. त्यांचे अभिनंदन! मावळत्या कार्यकर्त्या विनिता देशमुख यांनी हिरीहिरीने केलेल्या कार्याबद्दल त्यांचे आभार!

-- **प्रशांत करंदीकर** (हितगुज संपादक, प्रकाशक, आणि वितरक)

## डिव्हीएमएमएम संकांत सोहळा ...तिळगूळ घ्या गोड बोला

काही अपवाद वगळले, तर संकांत ही सहसा १४ जानेवारीला येते. सूर्याचे दक्षिणायन संपून उत्तरायण सुरू होते आणि दिवस मोठे व्हायला लागतात. ज्या दिवशी सूर्य धन राशीतून मकर राशीत जातो त्या संकमणाच्या दिवशी आपण हिंदू लोक "मकर संकांत" किंवा "संकांत" साजरी करतो.

१८ जानेवारी २००३ रोजी उत्साही मराठी मंडळींनी संकांतीचा सण साजरा केला. मंडळाच्या अध्यक्षा सौ. वनिता कुबल यांनी हळदकुंकू आणि संकांतीचे वाण देऊन कार्यकमाची सुरुवात केली. मंडळाचे खजिनदार श्री. विनय प्रधान यांनी १० ऑगस्ट रोजी मंडळाची मुहूर्तमेढ साजरी झाल्यापासूनचा आर्थिक अहवाल सभासदांपुढे सादर केला. संकांतीच्यावेळी काळया कपडयांना महत्व दिले जाते कारण काळी वस्त्रे उष्णता शोषून घेतात. म्हणूनच श्री आशिष चौघुले यांनी सुचवल्याप्रमाणे सर्व मराठी स्त्रिया पारंपारिक पद्धतीने संकांतीनिमित्त काळया साडया नेसून आल्या होत्या. आणि मग "तिळगूळ घ्या गोड बोला" असे म्हणत तिळगूळांची देवाणघेवाण झाली. सौ. वनिता कुबल यांनी खास हिंदूस्तानातून तिळाचे लाडू आणले होते. तर सौ. माया प्रधान यांनी चविष्ट तिळाच्या वडया करून आणल्या होत्या. गुळपोळी, मसालेभात, लोणचे असा संकांतीला अनुरूप बेत होता. आणि गुळपोळी बरोबर लोणकढे तूपही होते.

मराठी चित्रपट सृष्टीत वेगळा विषय आणि वेगळी मांडणी हया दृष्टीने महत्वाचे पाऊल उचलणारा "बिनधास्त" हा चित्रपट मोठया पडदयावर कार्यकमाच्या उत्तरार्धात दाखवण्यात आला.

आपली जुनी भांडणे विसरून पुन्हा स्नेहाचे, सलोख्याचे संबंध निर्माण करण्यासाठी आणि चांगले संबंध अधिक दृढ करण्यासाठी संकांत ही मोठी संधी असते. सणाच्या रूपाने अशी संधी वर्षातून एकदाच येते, म्हणूनच "तिळगूळ घ्या आणि वर्षभर गोड बोला"

--- समर्थ जोशी

## <u>न्यूयॉर्क शहर</u>

न्यूयॉर्क शहर
म्हणजे भलताच कहर
प्रत्येकच गोष्टीला
असते वेगळीच सर

जगातील आहे
आकर्षण मोठं
सामावलेली आहेत
पाचच बेटं

मुंम्बई प्रमाणे
उसळते भाऊगर्दी
गल्लोगल्ली असतात
स्टॉक्स मधले दर्दी

आकर्षणांची करतात
सगळेच कदर
त्यासाठी मोजतात
भरभक्कम दर

चलनी आहे
हुकमी एक्का
व्याजाचा दर
मात्र दीडच टक्का

मॅनहॅटन नावाचं
मुख्य बेट
त्याच्या केंद्र स्थानी
एम्पायर स्टेट

मॅनहॅटन बेटावर
तीन झुलते पूल
पोर्ट ऑथॉरीटी आकारते
जाडजुड टोल

नॅसडॅक डाऊ जोन्सची
आहे भागधारकांना मेजवानी
न्यूयॉर्क म्हणे
जगाची आर्थिक राजधानी

अर्थव्यवस्थेची होते
नेहमीच पायमल्ली
जागतिकीकरणाची गवसलीय
अचूक गुरूकिल्ली

म्हणुनच न्यूयॉर्क शहर
म्हणजे भलताच कहर
प्रत्येकच गोष्टीला
असते वेगळीच सर

- अवनीश लिमये

## <u>वर्ल्डकप २००३</u>

**सौरभ म्हणतो ...**
झाली आमची
जय्यत तयारी
वर्ल्डकपला पाहा
आमची भरारी

सचिन राहुल अन विरेंद्र
करणार दमदार फटकेबाजी
लागलीच तर आहे
युवराज आणि माझी फलंदाजी

कैफ नेहरा पार्थिव
सगळेच आहेत नवीन
आय सी सी प्रमाणे
विश्वास ठेवुन पाहिन

झहीर श्रीनाथ आणि आशिष
करणार तूफानी मारा
शेवटी हरभजन व कुंबळेवरच
असणार भर सारा

भारत पाकिस्तान लढत
गर्दी खेचणार
चुरशीच्या सामन्यात
आम्हीच जिंकणार

साउथ आफिका
भूषविणार यजमानपद
कुणास ठाऊक
मिळणार विजेतेपद

जगात निवडायची आहे
अव्वल दर्जाची टीम
झुंज झुंपणार
वर्ल्डकप २००३

- अवनीश लिमये

### <u>डिव्हीएमएमएम चे २००३ चे आगामी कार्यक्रम</u>

| | |
|---|---|
| गुढी पाडवा | एप्रिल ५ |
| पिकनिक | जून १४ किंवा २१ |
| गणेशोत्सव (आणि निवडणूक समिती स्थापना) | ऑगस्ट ३१ |
| दिवाळी (आणि २००४ कमिटीच्या निवडणुका) | ऑक्टोबर २५ किंवा २६ |

### डिव्हीएमएमएम गुढी पाडवा कार्यक्रम

**Date:** Saturday, April 5, 2003 **<u>Please RSVP by 3/29/2003 to any DVMMM Committee Member</u>**
**Time:** 2 PM to 7 PM
**Location:** Hindu Temple, Yorklin Road, Hockessin, DE
**Admission:** $6 Members, $10 non-members, Children (6-12) $3, under 6 free.
**Events:**

| | |
|---|---|
| 2 - 2:45 | मुलांचे कार्यक्रम (पाडवा व होळीच्या कथा, कविता, श्लोक, नाटक - भाग घेण्याची इच्छा असल्यास शैला वैद्य यांच्याशी २९ मार्चच्या आत संपर्क साधा) |
| 3 - 5 | आपली आवड - मराठी गाणी - वेस्ट चेस्टर, डेलावेअर, व न्यु जर्सी चे कलाकार |
| 5 - 6 | उत्तुंग -प्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनावर आधारित कार्यक्रमाची झलक |
| 6 - 7 | **पुरण पोळी आणि वरण-भात** |

## शब्द कोडे




**आडवे शब्द**

१ . गौरवाचा पुरस्कार
७ . दम लागणे
८ . सोडलेली मोकळी जागा
१० . लक्ष्मी
११ . सुश्राव्य ......... संगीत
१२ . शीर
१४ . घोडयाची शी
१६ . माळेतील ... ... ...
१७ . समुदाय
१८ . शंकर
२० . उंच डोंगरात असते खोल ... ...
२१ . सुर आणि ...
२२ . बायका हीची पुजा करतात
२७ . भाव
२८ . सरोवर
२९ . मुसलमानांचे पवित्र अन्न
३० . मोना ...
३२ . ... याला ईंग्लिश मध्ये कॅनाल म्हणतात
३४ . पावलांचा आवाज
३५ . अर्पण

**उभे शब्द**

१ . पुर्वीचे एक संस्थान
२ . प्रदर्शित करणे
३ . ... आणि धर्मेंद्र ही जोडी गाजली
४ . ... वेळ
५ . कुंचा
६ . तांदुळाची एक जात
९ . कावळा
१३ . वाडगा
१५ . गट समुदाय
१६ . आश्रम
१९ . कृष्णाचा मामा
२० . अत्यंत मऊ माती
२३ . वडिल
२४ . कृष्ण . . गोपींना आवडायच्या
२५ . कावळयाचे केकाटणे
२६ . सोबत
२५ . सर्प
२७ . सोन कोळसा यांची

- अवनीश लिमये

*डिव्हीएमएमएम च्या कार्यकर्त्या विनिता देशमुख व एक खंदे प्रायोजक विनय देशमुख व्यवसायानिमित्त सीमोल्लंघनास निघत आहेत. त्यांचे मंडळातर्फे हार्दिक आभार आणि शुभेच्छा. सर्व राज्ये फिरून आल्यावर डेलावेअर व्हॅली सारखे घर कुठेच नाही हे अनुभवून ते पुनश्च इथे परततील अशी आशा आहे.*